नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १५६ Issue - 156 | वार मंगळवार दि. २२ ऑक्टोबर २०२४ Blow- Tuesday Date 22 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# धर्मनिरपेक्षता अविभाज्याच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : 'धर्मनिरपेक्षता हा भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा अविभाज्य भाग आहे,' असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केले. राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' आणि 'सेक्युलर' या शब्दांच्या समावेशास आव्हान देणाऱ्या राज्यसभेचे माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी, वकील

## राज्यघटनेबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

विष्णू शंकर जैन आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने हा निर्वाळा दिला.

'धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा भाग आहे, असे या न्यायालयाने अनेक निकालांमध्ये म्हटले आहे. समतेचा अधिकार आणि राज्यघटनेत वापरलेला 'बंधुता' हा शब्द पाहिला, तर धर्मनिरपेक्षता हे राज्यघटनेचे मूळ वैशिष्ट्य असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात असे खंडपीठाने म्हटले आहे.

१९७६ मध्ये इंदिरा गांधी सरकारने आणलेल्या ४२व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' आणि 'सेक्युलर' हे शब्द समाविष्ट करण्यात आले. या दुरुस्तीने प्रस्तावनेतील भारताचे वर्णन 'सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक'वरून 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक,' असे बदलले. 'समाजवाद' या शब्दाचा समावेश केल्यास वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा येईल, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले होते, असे जैन यांनी सुनावणीदरम्यान सांगितले.

ते पुढे म्हणाले, 'प्रस्तावनेत सुधारणा करून दुरुस्ती करता येणार नाही.' त्यावर न्यायमूर्ती खन्ना म्हणाले, 'समाजवादाचे वेगवेगळे अर्थ आहेत आणि पाश्चिमात्य देशांमध्ये अवलंबलेला अर्थ घेऊ नये. संधीची समानता असावी आणि देशाच्या संपत्तीचे समान वाटप व्हावे, असाही समाजवादाचा अर्थ होऊ शकतो.' वकील अश्विनी उपाध्याय यांनी याबाबत याचिका दाखल केली होती.

राज्यघटनेची प्रस्तावना ही २६ नोव्हेंबर १९४९ जाहीर झाली होती, त्यानंतर दुरुस्तीद्वारे आणखी शब्द जोडणे ही मनमानी आहे, असे स्वामी यांनी म्हटले आहे. सध्याच्या प्रस्तावनेनुसार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय नागरिकांनी भारताला समाजवादी आणि **(पान २ वर..)**

# भारत चीनमध्ये समझोता; पूर्व लडाखमधील सीमेवर गस्तीबाबत सहमती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आणि चीनच्या सैनिकांदरम्यान जून २०२०मध्ये पूर्व लडाखमध्ये झालेल्या संघर्षानंतर सीमेवरील तणाव कमी करण्यासंबंधी महत्त्वाचा निर्णय घेण्यात दोन्ही देशांना यश आले आहे. पूर्व लडाखमध्ये प्रत्यक्ष ताबारेषेवरील काही संवेदनशील ठिकाणी गस्त घालण्यासंबंधी भारत आणि चीनदरम्यान सहमती झाल्याची घोषणा परराष्ट्र मंत्रालयाकडून सोमवारी करण्यात आली. सध्या प्रत्यक्ष ताबारेषेच्या दोन्ही बाजूंना ५०,००० ते ६०,००० सैनिक तैनात आहेत.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी सांगितले, की दोन्ही देशांदरम्यान अनेक आठवड्यांपासून चर्चेच्या फेऱ्या सुरू होत्या. सहमतीमधून सैन्यमाघारी आणि २०२०मध्ये उद्भवलेल्या समस्यांचे निवारण होईल. आता या दिशेने आणखी पावले उचलली जातील असेही त्यांनी सांगितले. मात्र, ही गस्त एप्रिल २०२०पूर्वी होती तशीच पूर्ववत करण्यासंबंधी सहमती आहे का, हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही एका खासगी कार्यक्रमात याला दुजोरा दिला.



भारत आणि चीनच्या जवानांदरम्यान साडेचार वर्षांपूर्वी झालेल्या थेट संघर्षानंतर सीमावाद पूर्णपणे सुटलेला नाही. मात्र, संघर्ष होणाऱ्या अनेक ठिकाणी दोन्ही बाजूंनी सैन्यमाघारी झाली आहे. प्रत्यक्ष ताबारेषेवरील डेपसांग आणि डेमचोक या भागांमधील गस्तीसंबंधी सहमती झाली असल्याचे समजते. या दोन्ही ठिकाणी चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने (पीएलए) माघार घ्यावी यासाठी भारताने आग्रह धरला होता. याच मुद्द्यावरून आतापर्यंत चर्चेतून ठोस निष्पन्न होत नव्हते. अखेर, चीनने भारताची मागणी मान्य केल्याचे दिसत आहे.

प्रत्यक्ष ताबारेषेवरील तणाव कमी करण्यासंबंधी चर्चेत लक्षणीय प्रगती झाल्याचे वृत्त 'इंडियन एक्स्प्रेस'ने २६ सप्टेंबरला दिले होते. त्याच दिवशी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या आशियाविषयक विभागाचे महासंचालक ली जिनसाँग आणि चीनमधील भारताचे राजदूत प्रदीप कुमार रावत यांची प्रत्यक्ष भेटीत चर्चा झाली होती. 'इंडियन एक्स्प्रेस'ला मिळालेल्या माहितीनुसार, या भेटीत सीमेवरील स्थिती एप्रिल २०२०पूर्वी होती तशी करण्यावर विचार करण्याचा समावेश होता. तसेच, अरुणाचल प्रदेशमधील समस्यांचे निवारण करण्याविषयी एकमत झाले होते.

**मोदी जिनपिंग द्विपक्षीय चर्चेची शक्यता**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारपासून रशियात होऊ घातलेल्या 'ब्रिक्स' परिषदेला हजर राहणार आहेत. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंगही परिषदेत सहभागी होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मोदी आणि जिनपिंग यांची शिखर परिषद होत असलेल्या कझान शहरात मंगळवारी किंवा बुधवारी द्विपक्षीय बैठक होऊ शकते, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयातील सूत्रांनी दिली. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मात्र सोमवारी याविषयीच्या प्रश्नाला बगल दिली. भारत, चीन, रशिया, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश असलेल्या या राष्ट्रगटाची परिषद २२ ते २४ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. एका बाजूला आम्ही सैन्यतैनातीला उत्तर देत होते, पण त्याचवेळी आमच्या वाटाघाटीही सुरू होत्या. आम्ही सप्टेंबर २०२०पासून वाटाघाटी करत होतो. तेव्हा मी चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी यांना मॉस्कोमध्ये भेटलो होतो. ही फार संयमी प्रक्रिया होती., असे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर म्हणाले.

# महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा पेच सुटला?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली आहे, महाराष्ट्रात आचारसंहिताही लागू झाली आहे. निवडणूक पार पडण्यासाठी जेमतेम २९ दिवस राहिले आहेत. तरीही महाविकास आघाडीचा जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. काही जागांवर शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेस या दोन पक्षांमध्ये पेच निर्माण झाला आहे. संजय राऊत यांनीही काँग्रेसला सुनावत त्यांनी जर मुंबईत निर्णय घेतला तर जागावाटप लवकर होईल असं म्हटलं होतं. तसंच महाराष्ट्रातल्या काँग्रेस नेत्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाही असंही म्हटलं होतं. यानंतर काँग्रेस एक बैठक पार पडली आहे. या बैठकीनंतर रमेश चेन्निथला यांनी महत्त्वाची माहिती दिली.

२२ ऑक्टोबर ला तीन वाजता मुंबईत महाविकास आघाडीची बैठक होईल. त्यानंतर २५ तारखेला आमची एक बैठक होईल. महाविकास आघाडीच्या सर्व जागांचा तिढा सुटेल आणि आम्ही जागावाटप जाहीर करु असं चेन्निथला म्हणाले. तसंच आजच्या बैठकीत आम्ही ६३ जागांबाबत चर्चा केली. त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याची माहिती माध्यमांना दिली जाईल. मुंबईत आम्ही आमच्या मित्रपक्षांशी चर्चा केल्यानंतर यादी जाहीर करु असंही चेन्निथला म्हणाले.

महाराष्ट्र विधानसभेच्या दृष्टीने आमची चांगली तयारी चालली आहे. जागांबाबत आमची चर्चा सुरु आहे. तसंच आमच्यात कुठलेही मतभेद किंवा वाद नाहीत. राहुल गांधी, प्रियांका गांधी हे देखील प्रचार करतील असंही चेन्निथला यांनी म्हटलं आहे. आघाडी म्हटलं की अशा प्रकारच्या काही गोष्टी होत असतात. पण आमचा अंतिम निर्णय २५ तारखेपर्यंत होईल असंही चेन्निथला यांनी स्पष्ट केलं.

आम्ही साधारण ९६ जागांवर चर्चा केली. तसंच लवकरच अंतिम निर्णयापर्यंत आम्ही येऊ. त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा जो मुद्दा आहे तो गंभीर आहे त्याबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. निवडणूक आयोग काय कारवाई करणार ते पाहू असं बाळासाहेब थोरात म्हणाले आहेत.

शिवसेना (उद्धव ठाकरे), काँग्रेस, आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या तिन्ही पक्षांमध्ये काही जागांवरुन पेच आहे. आज सकाळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिलेल्या माहितीनुसार ७ ते ८ जागांवरचाच तिढा उरला आहे. २२ ऑक्टोबरच्या (मंगळवार) बैठकीत यावर अंतिम निर्णय होईल अशी चिन्हं आहेत.

# काश्मीरमध्ये एनआयएकडून तपास सुरू; सुरक्षा दलांची शोधमोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यामध्ये रविवारी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर सोमवारपासून जोरदार तपास मोहीम हाती घेण्यात आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन पुरावे संकलित केले. तसेच सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांविरोधात शोधमोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत कोणालाही अटक करण्यात यश आलेले नाही.

गांदरबल जिल्ह्यात श्रीनगर-लेह महामार्गावर बांधकाम सुरू असलेल्या बोगद्याच्या ठिकाणी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये एक डॉक्टर आणि सहा मजूर ठार झाले. गुंड येथे बोगदा प्रकल्पावर काम करत असलेले मजूर आणि इतर कर्मचारी संध्याकाळी उशिरा त्यांच्या छावणीवर परतल्यानंतर किमान दोन दहशतवाद्यांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. संशयित दहशतवादी आणि त्यांचे समर्थक यांचा शोध घेण्यासाठी लष्कर, **(पान २ वर..)**

# ओडिशा-पश्चिम बंगालला चक्रीवादळाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



भुवनेश्वर/कोलकाता : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता सोमवारी वाढली असून त्याचे रूपांतर उद्या, बुधवारी चक्रीवादळामध्ये होईल आणि गुरुवारी रात्रीनंतर शुक्रवारच्या पहाटेपर्यंत हे वादळ ओडिशातील पुरी आणि पश्चिम बंगालमधील सागर बेटे या दरम्यान किनाऱ्याला धडकेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. यावेळी ताशी १२० किमीपर्यंत वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, बंगालचा उपसागर आणि लगतचा अंदमान समुद्र या भागात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र सोमवारी सकाळी ११.३० वाजता बंगालच्या उपसागराच्या पूर्व-मध्य भागावर होते. हे क्षेत्र पश्चिम-वायव्य दिशेने सरकत असून आज, मंगळवारच्या सकाळपर्यंत त्याचे रूपांतर तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात आणि उद्या, बुधवारपर्यंत चक्रीवादळात होईल. त्यानंतर **(पान २ वर..)**

## गडचिरोली पोलिसांनी घातपाताचा मोठा कट उधळला

**एक जवान जखमी, उपचार सुरु**

# चकमकीत पाच नक्षल्यांना कंठस्नान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**नक्षलवाद्यांविरुध्द महाराष्ट्रासह छत्तीसगड पोलिसांनीही आक्रमकपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्षली सैरभैर झाले आहेत. संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या काहींना अटक झाली तर काही चकमकीत ठार झाले. त्यामुळे ही चळवळ आता नेतृत्वहीन होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील नक्षली सीमावर्ती भागातील घनदाट जंगलाचा आश्रय घेऊन गडचिरोलीत घुसखोरी करत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.**

गडचिरोली : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना २१ ऑक्टोबरला यश आले. छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले. दोन वेगवेगळ्या ठिकाणी ही चकमक झाली. यावेळी एक जवानही जखमी झाला आहे. जखमी जवानाला हेलिकॉप्टरने गडचिरोलीत आणले. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, मृत पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह देखील गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादविरोधी अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे नक्षल्यांना जबर हादरा बसला आहे. अनेक जहाल नक्षलवादी चकमकीत ठार झाले तर काहींनी शरणागती पत्करली. त्यामुळे माओवादी चळवळ खिळखिळी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलवादी घातपात करु शकतात, ही शक्यता गृहित धरुन पोलीस सतर्क आहेत.

कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत. यात मृत नक्षल्यांची संख्या वाढू शकते, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी अपर अधीक्षक यतीश देशमुख , एम .रमेश यांच्या नेतृत्वात सी -६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफ च्या शीघ्रकृती दलाच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगलात पाठविण्यात आल्या. जंगलात दोन वेगवेगळ्या ठिकाणी माओवाद विरोधी अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

# मनसेच्या पहिल्या यादीत दोघांची नावे जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली जात आहे. भाजपाने काल (२० ऑक्टोबर) उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक अनेक संभाव्य याद्या समोर येऊ लागल्या. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात कडवी लढत होत असताना आता राज ठाकरेंनीही मैदानात उडी घेतली आहे. त्यांनीही आज दोन उमेदवारांची नावे जाहीर केली. ते डोंबिवली बोलत होते.

उमेदवारांच्या यादीवर शेवटचा हात फिरवला जातो आहे. आज किंवा उद्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर होईल. पण त्यापूर्वी कल्याण ग्रामीणमधून मी राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांची उमेदवारी जाहीर करतो आहे. येत्या २४ तारखेला मी दोघांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येत आहे, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे मनसेचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांच्या निवडणूक मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यासाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे सोमवारी डोंबिवलीतील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील मानपाडा येथे आले होते. कल्याण ग्रामीणमधून मनसेतर्फे राजू पाटील हे एकमेव उमेदवारीचे दावेदार आहेत. तेथेच त्यांनी राजू पाटील आणि अविनाश जाधव यांच्या नावांची घोषणा केली.

लोकसभा निवडणुकीच्यावेळी मनसेने शिवसेना, **(पान २ वर..)**

## थोडक्यात

### भाजप शेतकऱ्यांचा सर्वांत मोठा शत्रू; काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांची टीका

नवी दिल्ली : 'भारतीय जनता पक्ष हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सर्वांत मोठा शत्रू आहे,' अशी टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सोमवारी केली. 'डबल इंजिन सरकार हटवल्यानेच शेतकऱ्यांचा फायदा होईल, हे राज्याने ठरवले आहे,' असेही खर्गे म्हणाले. खर्गे यांनी 'एक्स'वर महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांच्या मुद्द्यावरून भाजपवर टीका करणारी पोस्ट लिहिली आहे. राज्याला दुष्काळमुक्त करण्याचे आश्वासन हा फक्त जुमला असल्याची टीकाही त्यांनी केली. 'भाजप महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सर्वांत मोठा शत्रू आहे. वीस हजार कोटी रुपयांच्या वॉटर ग्रीडचे आश्वासन खोटे निघाले. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचे आश्वासन जुमला आहे,' अशी टीका खर्गे यांनी केली. 'शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाकारण्यात आली असून, विमा कंपन्यांवर आठ हजार कोटी रुपयांचा वर्षाव करण्यात आला आहे,' असेही खर्गे यांनी म्हटले आहे.

### झारखंडमध्ये नवे पोलिस महासंचालक

नवी दिल्ली : निवडणूक आयोगाने झारखंडमधील सर्वांत वरिष्ठ पोलिस अधिकारी अजयकुमार सिंग यांची झारखंडच्या पोलिस महासंचालकपदी नियुक्ती केली आहे. यापूर्वीचे पोलिस महासंचालक अनुराग गुप्ता यांना पदावरून त्वरित हटवण्याचे निर्देश आयोगाने झारखंड सरकारला दिले होते. गेल्या दोन निवडणुकीदरम्यान पदाचा दुरुपयोग केल्याचा ठपका गुप्ता यांच्यावर ठेवण्यात आला होता.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### देशभर संताप

जम्मू आणि काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यामध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर सोमवारपासून जोरदार तपास मोहीम हाती घेण्यात आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन पुरावे संकलित केले. तसेच सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांविरोधात शोधमोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत कोणालाही अटक करण्यात यश आले-ले नाही. गांदरबल जिल्ह्यात श्रीनगर-लेह महामार्गावर बांधकाम सुरू असलेल्या बोगद्याच्या ठिकाणी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये एक डॉक्टर आणि सहा मजूर ठार झाले. गुंड येथे बोगदा प्रकल्पावर काम करत असलेले मजूर आणि इतर कर्मचारी संध्याकाळी उशिरा त्यांच्या छावणीवर परतल्यानंतर किमान दोन दहशतवाद्यांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. संशयित दहशतवादी आणि त्यांचे समर्थक यांचा शोध घेण्यासाठी लष्कर, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि पोलिसांनी छावणी आणि बोगद्याच्या आजूबाजूला शोधमोहीम हाती घेतली आहे. रविवारचा हल्ला बिगरकाश्मिरींवर झालेल्या सर्वात भीषण दहशतवादी हल्ल्यांपैकी एक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी जून २००६मध्ये दहशतवाद्यांनी बिहार आणि नेपाळमधून आलेल्या मजुरांना ठार केले होते. या हल्ल्यात सहभागी असलेल्यांपैकी कोणालाही अटक करण्यात यश आलेले नाही. पण दहशतवाद्यांपर्यंत नेणारे काही महत्त्वाचे सुगावे मिळतील अशी आशा असल्याचे अधिकारी म्हणाले. दहशतवादी हल्ल्याचा विविध राजकीय पक्षांकडून निषेध केला जात आहे. आम्ही दहशतवादाविरोधातील लढाईत एकत्र आहोत असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले. तर, तर, या हल्ल्याचे सुरक्षा दले बदला घेतील असे जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी सांगितले. या हल्ल्यासाठी पाकिस्तान जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला.

## मुलींना गर्भातच संपविण्याच्या पापाचा कायद्याने विनाश; 'ती' च्या साठी नऊ कायदे



आपल्या देशामध्ये महिलेला लक्ष्मीस्वरूप मानले जाते, ही अभिमानाची बाब आहे. पण, याच देशात मुलींना गर्भातच संपविण्याचे पापही अनेकांकडून केले जाते. त्यामुळे केंद्र सरकारने या पापाचा संपूर्ण विनाश करण्यासाठी १९९४मध्ये 'गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा' आणला. तेव्हापा-सून हा कायदा लक्ष्मीस्वरूप स्त्री-भ्रूणाचे संरक्षण करीत आहे.

हा कायदा येण्यापूर्वी देशामध्ये स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण खूप वाढले होते. अनेक जण गर्भधारणा झाल्यानंतर लिंग निदान करून स्त्री-भ्रूणाची गर्भातच हत्या करीत होते. परिणामी, देशातील स्त्री-पुरुष संतुलन बिघडले होते. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण उल्लेखनीयरीत्या कमी झाले होते. त्यामुळे या दैत्यरूपी मानसिकतेचा वध करण्यासाठी दुर्गामातेच्या शस्त्रासारखा कायदा हवा होता. अपवाद वगळल्यास हा कायदा ती गरज पूर्ण करीत आहे. या कायद्यामध्ये अनेक प्रभावशाली तरतुदी आहेत. या कायद्यानुसार प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ गर्भातील बाळामधील विकृतीची माहिती घेण्याकरिताच करता येतो, बाळाचे लिंग निदान करता येत नाही. असे करणे गंभीर गुन्हा आहे. कोणतीही प्रयोगशाळा, आरोग्य केंद्र किंवा रुग्णालये लिंग निदान करण्यासाठी अल्ट्रासोनोग्राफी किंवा इतर कोणतीही चाचणी करू शकत



नाहीत, तसेच, गर्भवती महिला किंवा तिच्या नातेवाइकांना गर्भातील बाळाचे लिंग कोणत्याही मार्गाने सांगितले जाऊ शकत नाही.

या कायद्यांतर्गतचा प्रत्येक गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र आहे आणि या गुन्ह्यात तडजोड करण्याची सुविधा नाही. गुन्हा सिद्ध झाल्यास आरोपीला किमान तीन ते कमाल पाच वर्षापर्यंत सश्रम कारावास आणि किमान १० हजार ते कमाल ५० हजार रुपयांपर्यंत दंड, अशी कठोर शिक्षा होऊ शकते. याशिवाय दोषी डॉक्टर, जेनेटिक कौन्सिलिंग सेंटर व प्रयोगशाळेचे लायसन्स रद्द केले जाऊ शकते.

**– अँड. सोनिया गजभिये, हायकोर्ट, नागपूर**

## बाबा सिद्दिकी हत्याकांड प्रकरणातल्या चार आरोपींना २५ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी

मुंबई : बाबा सिद्दीकी हत्याकांड प्रकरणात चार आरोपींना २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबरला हत्या करण्यात आली. बाबा सिद्दीकी यांना त्यांच्या मुलाच्या कार्यालयाजवळ हल्लेखोरांनी गाठलं. त्यांच्यावर गोळ्या झाडल्या आणि तिथून पसार झाले. ज्यातल्या दोन हल्लेखोरांना पोलिसांनी पाठलाग करुन आणि जिवाची बाजी लावून अटक केली. त्यानंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली. या चारही आरोपींना आता २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुरमेल सिंग, धर्मराज कश्यप, प्रवीण लोणकर आणि हरीश कुमार या चौघांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली. ही मुदत आज संपली. आज त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केलं तेव्हा त्यांना न्यायालयाने २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणाचा पोलिसांकडून कसून तपास सुरु आहे. आज मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने एका आरोपीला अटक केली आहे. हा आरोपी मूळचा राजस्थानमधील उदयपूरचा रहिवासी असल्याची माहिती सांगितली जात आहे. या आरोपीने १२ ऑक्टोबर रोजी बाबा सिद्दिकी यांची हत्या करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरवल्याचा आरोप आहे. भगवंत सिंग (३२) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव असून तो नवी मुंबईत राहत होता. भगवंत सिंग याच्या अटकेनंतर कोठडीत असलेल्या एकूण आरोपींची संख्या १० वर पोहोचली आहे.

भगवंत सिंग या आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने २६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, भगवंत सिंगने आरोपींना पुरवलेले शस्त्र कोठून आणले होते? त्याने ते शस्त्रे कसे पुरवले? तो राजस्थानमधून शस्त्रे घेऊन मुंबईत आला होता का? अशा सर्व गोष्टीचा तपास आता पोलिसांकडून करण्यात येणार आहे.

## मनसेच्या पहिल्या यादीत दोघांची नावे जाहीर

(पान १ वरून...)

भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष या महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. आता विधानसभेसाठी राज ठाकरे यांनी स्वतंत्र भूमिका घेऊन महायुती सोबत न राहता आपले उमेदवार उभे करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे लोकसभेच्या काळात महायुतीबरोबर असणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेच्या उमेदवारांचा सामना आता भाजपा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबर असणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्यावेळी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून मनसेचे आमदार राजू पाटील यांनी कल्याण लोकसभेतील महायुतीचे उमेदवार खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासाठी झटून काम केले होते. कल्याण ग्रामीणमध्ये महायुतीला नकारात्मक वातावरण असुनही स्थानिक शिवसेना कार्यकर्ते, आमदार पाटील यांनी झटून केलेल्या कामामुळे खा. शिंदे यांचे या भागातील मताधिक्य वाढले होते.

आता महायुतीमधून मनसे बाहेर पडल्याने राजू पाटील यांना कल्याण ग्रामीणमध्ये एकाकी लढत द्यावी लागणार आहे. या मतदारसंघात राजू पाटील दुसऱ्यांदा निवडणूक लढवित आहेत. यापूर्वीच्या निवडणुकीत ते दिवा भागाने दिलेल्या साथीने सहा ते सात हजाराच्या फरकाने निवडून आले होते.

राजू पाटील यांची लढत उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुभाष भोईर, शिवसेना शिंदे गटाचे राजेश मोरे यांच्याशी होणार आहे. या मतदारसंघात भाजपमधून कल्याण ग्रामीण प्रमुख नंदू परब उमेदवारीसाठी जोरदार प्रयत्न करत आहेत.

## धर्मनिरपेक्षता अविभाज्याच

(पान १ वरून..)

धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक करण्याचे मान्य केले, असे चित्रण करणे चुकीचे आहे. खंडपीठाने या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे सांगून पुढील सुनावणी १८ नोव्हेंबर रोजी ठेवली आहे.

हिंदुत्व या शब्दाऐवजी 'भारतीय संविधानवाद' (भारतीय संविधानवाद) वापरण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने जनहित याचिका फेटाळून लावली. 'हा प्रक्रियेचा पूर्णपणे गैरवापर आहे,' असे न्यायालयाने म्हटले आहे. दिल्लीतील रहिवासी एस. एन. कुंद्रा यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर कोणतीही सुनावणी होणार नाही, असे म्हणून याचिका फेटाळण्यात आली.

## काश्मीरमध्ये एनआयएकडून तपास सुरू; सुरक्षा दलांची शोधमोहीम

(पान १ वरून..) केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि पोलिसांनी छावणी आणि बोगद्याच्या आजूबाजूला शोधमोहीम हाती घेतली आहे. रविवारचा हल्ला बिगरकाश्मिरींवर झालेल्या सर्वात भीषण दहशतवादी हल्ल्यांपैकी एक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी जून २००६मध्ये दहशतवाद्यांनी बिहार आणि नेपाळमधून आलेल्या मजुरांना ठार केले होते. या हल्ल्यात सहभागी असलेल्यांपैकी कोणालाही अटक करण्यात यश आलेले नाही. पण दहशतवाद्यांपर्यंत नेणारे काही महत्त्वाचे सुगावे मिळतील अशी आशा असल्याचे अधिकारी म्हणाले. दहशतवादी हल्ल्याचा विविध राजकीय पक्षांकडून निषेध केला जात आहे. आम्ही दहशतवादाविरोधातील लढाईत एकत्र आहोत असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले. तर, तर, या हल्ल्याचे सुरक्षा दले बदला घेतील असे जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी सांगितले. या हल्ल्यासाठी पाकिस्तान जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला. नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी पाकिस्तानशी चर्चा शक्य नसल्याचे सांगितले.

## ओडिशा–पश्चिम बंगालला चक्रीवादळाचा इशारा

(पान १ वरून..) हे वादळ वायव्य दिशेने सरकून, गुरुवारी सकाळपर्यंत बंगालच्या उपसागराच्या आग्नेयेकडे ओडिशा–पश्चिम बंगालच्या किनाऱ्याजवळ पोहोचेल.

मच्छिमारांनी २६ ऑक्टोबरपर्यंत समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. हा चक्रीवादळाचा ओडिशा राज्याला सर्वाधिक तडाखा बसण्याचा अंदाज असून ओडिशाच्या किनाऱ्यावर हे वादळ अधिक काळ घोंघावत राहील, या काळात ताशी १०० किमीपर्यंत वेगाने वारे वाहतील, अशी माहिती हवामान खात्याचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी दिली. ओडिशातील बहुतांश ठिकाणी उद्या, बुधवारी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल. गुरुवार–शुक्रवारी काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार, तर तुरळक ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, ओडिशा सरकारने किनारी जिल्ह्यांच्या प्रशासनांना अतिदक्षतेचा इशारा दिला असून धोका असलेल्या ठिकाणच्या नागरिकांच्या स्थलांतरासह अन्य उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

**बेंगळुरूचे जनजीवन विस्कळीत; शाळांना सुट्टी**

बेंगळुरू : मागील दोन दिवस बेंगळुरूला मुसळधार पावसाने तडाखा दिला असून, अनेक ठिकाणी सखल भागांत आणि रस्त्यावर पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे सोमवारी शहरातील सर्व शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना सुट्टी देण्यात आली. पावसामुळे शहरातील शाळांना एका आठवड्यात दुसऱ्यांदा सुट्टी मिळाली आहे.

## आजपासून निवडणूक अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू उमेदवारासोबत पाच व्यक्तींना मिळणार प्रवेश : प्रा. खडसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ ला जाहिर केला आहे, विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २४- सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघामध्ये उद्या दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ पासून निवडणूकिचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होत आहे.

महाराष्ट्रातील विधानसभेच्या एकूण २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे.

मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेले महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे,

दि. २२ ऑक्टोंबर २०२४ पासून निवडणूक अधिसूचना जारी होणार आहे,



दि. २९ ऑक्टोंबर २०२४ उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख असून,

दि. ३० ऑक्टोबर २०२४ ला अर्जांची छाननी होणार आहे,

दि. ४ नोव्हेंबर २०२४ अर्ज माघारी घेण्याची मुदत पर्यंत असेल. अर्ज माघारी घेतल्यानंतर त्याच दिवशी उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप करण्यात येणार आहे.

दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक उमेदवारांचे अर्ज हे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षामध्ये तहसील कार्यालय येथे उपलब्ध होणारा असून, मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या तहसील कार्यालय येथील दालनामध्ये अर्ज स्वीकृती होणार आहे. अर्ज स्वीकृती साठी उमेदवारा सोबत फक्त ५ व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे असे मा. खडसे यांनी सांगितले.

## श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२०२५ चा गळीत हंगामाचा १५ वा बॉयलर अग्निप्रदिपन कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.झुंजार लक्ष्मण आसबे यांच्या शुभहस्ते व श्री सत्यनारायण व होम हवन पुजा कारखान्याचे जेष्ठ कर्मचारी बाळासाहेब कोंडीबा शिंदे व सौ.सुवर्णा बाळासाहेब शिंदे या उभयंताच्या शुभहस्ते करण्यात आली. सुरुवातीस सहकार महर्षी गणपतराव साठे, संत कुर्मदास महाराज व लोकनेते स्व.विलासरावजी देशमुख साहेब यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.




कार्यकारी संचालक यांनी बोलताना सांगितले की, कारखान्याच्या येता गळीत हंगामासाठी १.७५ ते २.०० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यादृष्टीने मशिनरी दुरुस्ती व देखभालीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत.तसेच ऊस तोडणी वाहतुक यंत्रणेसाठी अॅडव्हान्स वाटप करुन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.हंगामाचे ऊस गाळपाचे उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला नोंदवलेला संपूर्ण ऊस श्री संत कुर्मदास कारखान्यास गाळपासाठी देवून सहकार्य करावे असे आवाहन केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी कारखान्याचे संस्थापक चेअरमन अॅड.मा. श्री.धनाजीराव साठे साहेब, व्हाईस चेअरमन.मा.श्री.सुधीर पाटील, मार्गदर्शक बी.डी.पाटील, संचालक श्री.दादासाहेब साठे, श्री.भालचंद्र पाटील, श्री.हरीदास खताळ, श्री शशिकांत देशमुख, श्री.राहुल पाटील, श्री. विठ्ठल शिंदे, श्री.सयाजी पाटील, श्री.विजयसिंह पाटील, श्री.बाळासाहेब पाटील, श्री.मधुकर चव्हाण, श्री.नारायण गायकवाड, श्री.सिराज शेख, श्री.शंकर नाईकवाडे, सौ.सध्याराणी खरात, सौ.शालिनी कदम, सौ. कमल लोंढे, श्री.संजय इंगळे, श्री.भाऊसाहेब लोंढे, श्री.सचिन पाटील, श्री.शरद घोलप, प्रोडक्शन मॅनेजर श्री.बाळासाहेब पवार, सेक्रेटरी चंद्रहास गायकवाड, चिफ इंजिनिअर शकील शेख, चिफ अकौंटंट रावसाहेब दुधाणे, डे.चिफ केमिस्ट श्री.सुनिल बाळसराफ, मुख्य शेती अधिकारी श्री.प्रकाश शिंदे, शेती अधिकारी दिपक कुलकर्णी, परचेस ऑफिसर श्री.अविनाश बागल, टाईम किपर सिध्देश्वर बिनगे,नेताजी शिंदे, धैर्यसिंह निंबाळकर, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते,उपस्थितांचे स्वागत व आभार कारखान्याचे शेती अधिकारी श्री.दिपक कुलकर्णी यांनी मानले.

## शुक्रवारपासून सकाळी ६.२५ वाजता विवेक घळसासी यांचे ॲम्फी थिएटरमध्ये निरूपण

सोलापूर, (प्रतिनिधी):- महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा दक्षिण सोलापूर आणि आर्यन क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २५, शनिवार दि. २६, आणि रविवार दि. २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ वा. २५ वाजता लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर येथे विवेकाची अमृतवाणीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पूर्णयोग, पूर्णयोग : अंतरंग साधना आणि पूर्णयोगातील गतिरोध या तीन विषयावर ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी हे आपल्या अमृतवाणीतून वैचारीक दीपोस्तव साजरा करीत असल्याची माहिती मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे रांनी दिली.

गेल्या १४ वर्षापासून अखंडपणे विविध विषयावर दीपावलीपूर्व बौध्दिक मेजवानी देण्याची परंपरा विवेकाच्या अमृतवाणी मधून निरूपणकार विवेकजी घळसासी करीत आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर आणि आर्यन क्रिएशन यांच्या वतीने हा वैचारिक दिपोत्सव साजरा करण्यात येत असून यासाठी पु ना गाडगीळ यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. विवेकाच्या अमृतवाणी मधून यंदाच्या वर्षी पहिल्या दिवशी पूर्णयोग, दुसर्या दिवशी पूर्ण योग – अंतरंग साधना, आणि तिसर्या दिवशी पूर्णयोगातील गतिरोध अशा तीन दिवसीय निरूपणातून वैचारीक दीपावली साजरी होणार आहे. दिवाळी पूर्वीची पहाट चांगल्रा विचाराने सुरू व्हावी दिवाळीची सुरूवात मंगलमय वातावरणात बौध्दिक मेजवानीने विवेकाच्या अमृतवाणीमधून केली जात आहे. यापुर्वी प्रभु श्रीराम, महाबली हनुमान, श्रीकृष्ण, चाणक्य, रामायण, महाभारत यावर प्रवचन करण्यात आले असून या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद देत सभागृहात मोठ्या संख्येने गर्दी केली होती. विवेक घळसासी यांच्या रसाळवाणीतून आलेल्रा प्रत्येक विषयाचे व्याख्यान ऐकून रसिक श्रोते मंत्रमुग्ध होतात. दिवाळीतील गोड फराळाचा आनंद घेण्यापूर्वी बौध्दिक विचारांची मेजवानी विवेकाची अमृतवाणी यातून मिळते.

सकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी विवेक घळसासी यांचे निरूपण वेळेवर सुरू होऊन वेळेवर सकाळी ७.३० वाजता संपणार आहे. तरी या मंगलमय बौध्दिक आणि वैचारीक मेजवानी असलेल्या विवेकाची अमृतवाणी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांच्याकडून करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने पळवला मोबाईल

सोलापूर, (प्रतिनिधी) : सात रस्ता येथील सिरॉक हॉटेल समोरील चायनीज गाड्यावर असलेल्या गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने ८ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी इम्तियाज अजीज पगडीवाले (वय-४७,रा.सात रस्ता हूमा मेडिकल बोळात) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरडाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मुलाणी हे करीत आहेत.

### दर्शन करून येताना अपघात; वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : दर्शन करून घरी जाताना अज्ञात वाहनाने महिलेस धडक देऊन जखमी केल्याची घटना १५ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान नेहरु नगर येथे घडली. याप्रकरणी कमरुनिसा राजू शेख (वय-३१,रा.नंदिनगर माशाळ वस्ती) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांची बहीण आसमा व परवीन असे मिळून ट्रिपल सीट दर्शन करून घरी जात असताना वरील ठिकाणी आले असता वाहन क्रमांक एमएच.१२.एन.एक्स.७१६० यातील चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवून फिर्यादी यांच्या दुचाकीला मागून धडक देऊन फिर्यादीस जखमी करुन दुचाकीचे नुकसान करण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सोनार हे करीत आहे.

### उधारीचे पैसे मागितल्यावर लोखंडी रॉडने मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : उधारीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून शिवीगाळ करत लोखंडी रॉडने तरुणास मारहाण केल्याची घटना २० ऑक्टोबर रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास आसरा चौक येथे घडली. याप्रकरणी सैफअली कादर मुजावर (वय-३२,रा.तेलंगी पाच्छा पेठ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गुलजमाल खान (रा.कल्याणी टावर बेगम पेठ) व त्यांचे वडील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी यांनी एस आर हार्डवेअरचे उधारीचे पैसे वरील संशयित आरोपी यांना मागितल्याच्या रागावरून फिर्यादीस शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यानंतर संशयित आरोपी यांचे वडील याने फिर्यादीच्या अंगावर येऊन तोंडावर लोखंडी वस्तूने मारून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत जखमी केले. तसेच तेथून तू निघून जा नाहीतर तुला खल्लास करतो. अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.तरंगे हे करीत आहेत.

# पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृतीदिन संपन्न



## पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद झालेल्या जवानांना मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) पोलीस स्मृती दिनानिमित्त पोलीस मुख्यालय सोलापूर येथे पोलीस आयुक्तालय, पोलीस अधीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र केगाव, रा.रा.पोलीरस बल गट क्रमांक १० सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज मंगळवारी पोलीस स्मृती दिन संपन्न झाले.



१-९-२०२३ ते ३१-८-२०२४ या कालावधीत देशामध्ये पोलीस दलातील २१६ पोलीस अधिकारी व जवान हे आपले कर्तव्य बजावत असताना शहीद झाले आहेत.त्यांचे हौतात्म्याचे स्मरण करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.यावेळी जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी,पोलीस आयुक्त एम राजकुमार,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,समादेशक पंकज अतुलकर,प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्राचे विजयकुमार चव्हाण,पोलीस उपायुक्त विजय कबाडे,पोलीस उपायुक्त दिपाली काळे,अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर आदी उपस्थित होते.

मुंबई शहरावर सन २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले दिवंगत पोशि. राहुल शिंदे यांचे वडिल सुभाष शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना श्रध्दांजली अर्पण केली.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस जिल्हासत्र न्यायाधीश सलमान आझमी,यांनी २१ ऑक्टोबर पोलीस स्मृतीदिन संदेशाचे वाचन केले.तसेच यावेळी वर्षभरात संपूर्ण देशात आपले कर्तव्य बजावत असताना आपल्या प्राणाची आहुती देवून हौतात्म्य प्राप्त झालेले २१६ पोलीस अधिकारी व जवान यांचे नावाचे स्मरण,वाचन सहायक पोलीस आयुक्त वाहूतक विभाग खिरडकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी करून शोक शस्त्रद्वारे मानवंदना दिली.

# यशवंत पंचायतराज राज्य समितीकडून सोलापूर जिल्हा परिषदेची तपासणी; समितीकडून कामांची प्रशंसा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाच्या वतीने यशवंत पंचायतराज अभियान अंतर्गत पुरस्कारासाठी राज्यस्तरीय तपासणी समिती कडून सोलापूर जिल्हा परिषदेची तपासणी करणेत आली.

**सोलापूर जिल्हा परिषदेत एकजुटीचे दर्शन : अतिरिक्त सिईओ बडे**

**सोलापूर जिल्हा परिषदेने पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. नुसार राज्य स्तरीय पुरस्कारासाठी सोलापूर जिल्हा परिषदेची तपासणी करणेत आली आहे. सोलापूर जिल्हा परिषद विविध पुरस्कारामुळे राज्य स्तरावर नाव होत आहे. ही खुप समाधानाची बाब आहे. या निमित्ताने सर्व माहिती सादर करताना सर्व विभागाची एकजुट दिसून आली असल्याचे समिती प्रमुख सत्यजित बडे यांनी सांगितले.**

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात आज यशवंत पंचायत राज समिती जिल्हा परिषदेने सादर केलेले प्रस्तावा नुसार तपासणी केली. सन २२-२३ अंतर्गत सखोल तपासणी केली. रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, रायगड जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्प यंत्रणा विभागाच्या प्रकल्प संचालक प्रियंदर्शनी मोरे यांनी सर्व प्रस्तावातील बाबींची तपासणी केली. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वाकडे -ठोके, यांचे सह विभाग प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी उप मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन) स्मिता पाटील यांनी प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांचे स्वागत केले तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बडे यांचे स्वागत कार्यकारी अधियंता संतोष कुलकर्णी यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी शासनाने दिलेले उदिष्ट्य पुर्ण करणे बरोबरच विविध नाविण्यपुर्ण योजना राबविणेत आलेले आहेत. त्याचे सादरीकरण व विविध पुरस्कार प्राप्त झालेली माहिती समिती समोर सादर करणेत आली. जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सादरीकरण केले. देशपातळीवर स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण मध्ये उत्कृष्ठ कामगिरी करून राज्यात सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटाकविला आहे. प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामा बाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषेदेच्या फेसबुक, सोशल मिडिया अंतर्गत कामाचे समितीने कौतुक केले. सिईओ कुलदीप जंगम व अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांचे मार्गदर्शना खाली विभाग प्रमुख उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीकांत मिरगणे, शिक्षणाधिकारी शेख, कार्यकारी अभियंता खरात, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांचे सह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी या साठी नियोजन करून माहिती सादर केली. सुत्रसंचालन विवेक लिंगराज यांनी केले. जिल्हा परिषदेतील सर्व कक्ष अधिकारी अधीक्षक व कर्मचारी यांनी यासाठी मेहनत घेतली.

# आबासाहेब फलफले यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : गलांडवाडी नंबर १ तालुका इंदापूर येथील प्रगतशील बागायतदार व इंदापूर तालुका खरेदी विक्री संघाचे सचिव आबासाहेब नारायण फलफले (वय ५०) यांचे शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी रात्री हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले त्यांच्या पाश्चात आई, पत्नी, व दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने गलांडवाडी नंबर एक व इंदापूर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



## आमदार दत्तात्रय भरणे यांचा मुहूर्त ठरला

# शुक्रवारी अजित पवारांच्या उपस्थितीत भरणे उमेदवारी अर्ज दाखल करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधीः अतुल सोनकांबळे

इंदापूर : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षा कडून आमदार दत्तात्रय भरणे इंदापूर विधानसभा निवडणुक उमेदवारी अर्ज शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत भरणार आहेत. असे दत्तात्रय भरणे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. दत्तात्रय भरणे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी इंदापूर मध्ये शुक्रवारी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. बरेच दिवसापासून इंदापूर मध्ये महायुतीचा उमेदवार कोण असणार आहे. याची इंदापुरातील जनतेला उत्सुकता होती परंतु आजपर्यंत यावर कोणत्याही राजकीय नेत्याने भुमिका स्पष्ट केली नव्हती. दत्तात्रय भरणे यांनी काल पत्रकारांशी बोलताना शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माझा अर्ज दाखल करणार आहे असे सांगितले यामुळे निश्चितच इंदापूर मध्ये राजकीय संग्राम सुरू झाला आहे असे म्हणायला वावगं ठरणार नाही. बरेच दिवसापासून इंदापूर मध्ये अनेक राजकीय घडामोडी घडत गेल्या आहेत बॅनरबाजी असो किंवा कार्यकर्त्यांकडून सोशल मीडियामध्ये स्टेटसबाजी, आरोप प्रत्यारोप सुरू होते. दत्तात्रय भरणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची तारीख व वेळ सांगितल्यामुळे भरणे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण आहे.

**जी माणसं पाच वर्षे लोकात राहतात, कामे करतात, लोकांना मदत करतात, सहकार्य करतात, अशांना कशाचीही टेन्शन व भिती वाटत नाही, मी गेले पाच वर्ष प्रमाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मला टेन्शन घेण्याची गरज नाही.**



## राज्यातील सर्व जागा ताकदीनिशी लढविणार — जिल्हाध्यक्ष बी डी.शिंदे

# प्रस्थापितांची सत्ता उलथवून वंचित बहुजन आघाडी सत्तेत येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव, सुधाकर रणदिवे : वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी राज्यातील सर्वच्या सर्व २८८ जागा पूर्ण ताकदीनिशी लढविणार आहे. यंदा कुठल्याही परिस्थितीत वंचित बहुजन आघाडी प्रत्येक मतदार संघामध्ये खाते उघडून सत्तेमध्ये निश्चितपणे येणार असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष बी.डी. शिंदे यांनी दि.२१ ऑक्टोबर रोजी केला.

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने धाराशिव जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघासाठी उमेदवारी जाहीर झाली असून त्या संदर्भात माहिती देताना ते बोलत होते. यावेळी पक्षाचे जिल्हा निरीक्षक अविनाश भोसीकर, उमेदवार ड प्रणित शामराव डिकले (धाराशिव), डॉ स्नेहा सोनकाटे (तुळजापूर) व विकास बनसोडे आदी उपस्थित होते.




पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, सर्व समाज घटकांना सत्तेचा वाटा मिळाला पाहिजे. मात्र प्रस्थापित राजकीय मंडळी समाजातील गोरगरीब व वंचित घटकांना दूर लोटत आहेत. त्यामुळे ॲड बाळासाहेब आंबेडकर यांनी सर्व जातीसमूहाची एकत्र मुठ बांधून सर्वच्या सर्व जागा लढवून त्या निवडून आणण्यासाठी ध्येय धोरण निश्चित केले आहे.

ॲड बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सक्षमपणे प्रचार यंत्रणा राबवून शेवटच्या झोपडीमधील वंचित घटकांपर्यंत जाऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची भूमिका स्पष्ट करणार आहे. तसेच प्रचारामध्ये शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव, ओबीसी आरक्षण, नुकताच आरक्षणासंदर्भात क्रिमिलियर आणले असून त्यामुळे एससी एसटी या प्रवर्गाचे आरक्षण संपवण्याचा घाट भाजप व काँग्रेसने घातला असल्याचा आरोपी त्यांनी केला.

तर उमेदवार डॉ सोनकाटे म्हणाल्या की, मी उच्चशिक्षित अर्थो डॉक्टर असून या जिल्ह्यात पहिल्या प्रथम वंचित बहुजन आघाडीने महिला म्हणून मला उमेदवारी दिली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून महिलांची खूप मोठी मूठ बांधत असल्यामुळे महिलांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे ठामपणे उभे रहावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच माझा सर्वसामान्य नागरिकांशी थेट संपर्क असून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. तर तुळजापूर मतदार संघातील वर्षानुवर्ष प्रलंबित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी मी प्राधान्य देणार मी प्रस्थापितांच्या सत्तेला सुरू लावून निश्चितपणे आमदार होणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच ॲड डिकले म्हणाले की, आजपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांनी जिल्ह्यातील विकासाचे प्रश्न सोडविले नसल्यामुळे देशात अविकसित जिल्ह्यामध्ये धाराशिव जिल्ह्याचा पहिल्या तीन जिल्ह्यांच्या यादीमध्ये समावेश करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मी सर्वसामान्य मराठा कुटुंबातील असून मतदारांनी कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना आपले बहुमूल्य मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# स्वा. सावरकर विद्यालयात कर्म. ॲड. अण्णासाहेब मुरकुटे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ,स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे कर्मवीर ॲड.अण्णासाहेब मुरकुटे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. असुन अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक शिंदे लहानू हे होते.या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप शिवाजीराव, सावकार नितीनकुमा, सांस्कृतिक प्रमुख सुधाकर निकम, रोशन दवते, विजय पवळे, दत्तात्रय दराडे, राजेंद्र पवार, मनोज मोगल आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. असुन यावेळी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर ॲड.अण्णासाहेब मुरकुटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सुधाकर निकम , रोशन दवते ,यांनी कर्मवीरांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेसाठी केलेली कार्य याविषयी सखोल माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात लहाणू शिंदे यांनी कर्मवीर ॲड.अण्णासाहेब मुरकुटे यांनी सामाजिक राजकीय, आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केल्याचे सांगितले.विद्यालयाचे वतीने ॲड.अण्णासाहेब मुरकुटे यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर निकम तर आभार विजय पवळे, भाऊसाहेब यांनी केले .कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# शासकीय यंत्रणांनी रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवावी : सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अभय सप्रे

## पोलीस व परिवहन विभागाने वाहतूक नियमांची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनीधी):- भारतात प्रतिवर्षी ४ लाखापेक्षा अधिक रस्ते अपघात होतात व त्यामध्ये १ लाख ७५ हजार लोकांचा मृत्यू होतो. हे मृत्यूचे प्रमाण जगातील इतर देशात होणाऱ्या अपघाताच्या प्रमाणापेक्षा खूप अधिक आहे. अपघाताच्या कारणांमध्ये वाहनाचा अति वेग, हेल्मेट व सीट बेल्ट न वापरणे तसेच दारू पिऊन गाडी चालवणे या कारणांचा समावेश आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी मोहीम राबवावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अभय सप्रे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत माजी न्यायाधीश तथा रस्ता सुरक्षा समितीचे चेअरमन अभय सप्रे मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी सोलापूर, बीड व धाराशिव या तीन जिल्ह्याच्या रस्ते अपघात व त्यातील मृत्यू झालेल्या व्यक्ती तसेच रस्ते कामांचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे(दूरदृष्टी प्रणाली द्वारे), सर्वोच्च न्यायालयाने स्थापित केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे विधी सल्लागार ॲड. हर्षित खंदार, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह परिवहन विभागाचे सर्व अधिकारी, राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी व अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

माजी न्यायाधीश श्री. सप्रे पुढे म्हणाले की, जगात अमेरिकेसारख्या देशात वर्षाला ६० लाखापेक्षा अधिक अपघात होतात तर मृत्यूचे प्रमाण ४० हजार लोक इतके आहे. परंतु भारतात वर्षाला चार लाख ६१ हजार इतके अपघात होतात तर मृत्यूचे प्रमाण एक लाख ७५ हजार लोक इतके आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला स्वत:हून यामध्ये रस्ता सुरक्षा समिती स्थापन करून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यांना संपूर्ण देशभरात फिरून रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन करत असलेले काम पाहणे प्रशासकीय यंत्रनेला मार्गदर्शन करणे, सल्ला देणे व अपघाताचे प्रमाण कमी करून त्यात होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी यंत्रणांना आदेशित करणे यासाठी नियुक्त केलेले आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### जिल्ह्यातील कंपन्यांनी अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी सीएसआर फंड उपलब्ध करावा

**सोलापूर जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी रस्ता सुरक्षा समितीचे चेअरमन तथा सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अभय सप्रे यांनी जिल्ह्यातील वाहन वितरक, बस वाहतूक संघ, ट्रक वाहतूक संघ व ऑटोमोबाईल क्षेत्रातील उत्पादक कंपन्या यांचे प्रतिनिधी समवेत नियोजन भवन सभागृह येथे चर्चा केली. यावेळी त्यांनी कंपन्यांनी त्यांच्या सीएसआर फड मधून सोलापूर जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांना निधी उपलब्ध करून द्यावा अशा सूचना दिल्या.**

जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, परिवहन विभाग, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग यासह अन्य सर्व संबंधित विभागांनी रस्ते अपघाताचे प्रमाण कमीत कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच अपघातातील मृत्यूचे दर खूपच कमी होईल किंवा मृत्यूच होऊ नयेत यासाठी आवश्यक सोयीसुविधा तर उपलब्ध करून द्याव्यातच परंतु वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन माजी न्यायाधीश श्री. सप्रे यांनी केले. तसेच जिल्हा प्रशासनाने त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या हजारो अधिकारी व कर्मचाऱ्यांना हेल्मेट सक्ती करावी. हेल्मेट घालूनच घरून कार्यालयापर्यंत आले पाहिजे असा नियम करावा. जे अधिकारी कर्मचारी हेल्मेट घालून येणार नाहीत अथवा चार चाकी मध्ये सीट बेल्ट लावणार नाहीत आशांवर वाहतूक नियमा अंतर्गत कार्यवाही करावी असेही त्यांनी निर्देशित केले.




सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर अपघाताचे व मृत्यूचे प्रमाण खूप अधिक आहे. तरी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या कारणांचा त्वरित शोध घेऊन ब्लॅक स्पॉट काढून टाकावेत. महामार्गावर कोठेही अपघात होणार नाहीत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. पोलीस विभागाने सर्व वाहनचालकांचे लायसन्स व इन्शुरन्स चेक करावा. टू व्हीलर चालवणाऱ्यांनी हेल्मेट घातलेच पाहिजे यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे जर ऐकत नसतील तर त्यांना दंड करावा परंतु त्यांनी हेल्मेट घालणे सक्तीचे करावे. फोर व्हीलर मध्ये वाहन चालक व अन्य प्रवाशांनी सीट बेल्ट लावला पाहिजे याची सक्ती करावी. जेव्हा नागरिक वाहतूक नियमाविषयी माहिती देऊनही त्याचे पालन करत नसतील तर पोलीस विभागाने त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधितावर दंडात्मक कारवाई करून सक्तीने नियमाचे पालन करून घेणे आवश्यक असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राष्ट्रीय महामार्गावरील ब्लॅक स्पॉट दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरू असून पुढील सात ते आठ महिन्यात ते दुरुस्त होतील व त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रशासन जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग राज्य महामार्ग शहरातील अंतर्गत रस्ते ग्रामीण भागातील रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवत आहे व ती अधिक प्रभावीपणे राबवण्यात येईल असे त्यांनी सांगितले. यावेळी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक व धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांनी अनुक्रमे बीड व धाराशिव जिल्ह्यातील रस्ते अपघाताची माहिती देऊन प्रशासन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी करत असलेल्या उपाययोजना विषयी सविस्तरपणे सादरीकरण करून माहिती दिली. प्रारंभी सोलापूरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी सोलापूर जिल्ह्यातील रस्ते अपघातांची माहिती दिली. तसेच प्रशासन अपघात कमी करण्यासाठी विविध उपाय योजना राबवत असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### प्रियांका गांधी वायनाडमधून पोटनिवडणूक लढणार, उद्या अर्ज भरणार

नवी दिल्ली : काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी वड्रा वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी येत्या बुधवारी उमेदवारी अर्ज भरणार आहेत. काँग्रेसच्या सूत्रांनी ही माहिती दिली. प्रियांका अर्ज भरत असताना काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित राहणार आहेत. प्रियांका यांनी सोमवारी खर्गे यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे वायनाड व रायबरेली येथून निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी वायनाडमधील खासदारकीचा राजीनामा दिल्याने १३ नोव्हेंबर रोजी ही पोटनिवडणूक होत आहे.

# नळदुर्ग महाविद्यालयात एकदिवशीय आरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : नळदुर्ग ता.तुळजपूर येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात एकदिवशीय आरोग्य शिबीर घेण्यात आले. प्रथमत: या कार्यक्रमाचे औचित्य साधून माजी विध्यार्थी प्रताप महादेव गंजे, तुगाव ह्या विध्यार्थ्यांचे त्याने दक्षिण कोरीया या ठिकाणी जाऊन पीएचडी संशोधन पूर्ण करून पुढे तो पोस्ट डॉक करीत आहे त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे व त्याच्या पालकांचे यथोचित असा सत्कार करण्यात आला. त्यानंतर ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रीन क्लब समन्वयक प्रा. डॉ. उध्दव भाले यानी केले.




यावेळी आयकुयेसीचे समन्वयक प्रा. डॉ. शिवाजी घोडके यानी कार्यक्रमाविषयी विचार मांडले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यानी आरोग्य विषयीची जागरुकता किती गरजेचे आहे असे अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले. त्यानंतर प्रत्यक्षपणे आरोग्य शिबीराला सुरुवात झाली. त्यासाठी डॉ. विशाल सेदवाड, वैदयकीय अधिकारी, ग्रामीण रुग्नालय, नळदुर्ग, त्यांच्यासोबत लॅब टेक्नीशियन कु छकुली राठोड, कु जयश्री पाटील आणि स्टॉफ नर्स कु सुंभागी नागरसंगे ह्या उपस्थित होत्या. या शिबीरामध्ये सर्व प्रथमोपचार संबंधाने विविध चाचण्या करण्यात आल्या. त्यामध्ये बीपी, सीबीसी, थॉयरॉईटस, किडनी, रक्तातील तांबडया, पांढऱ्या पेशी, प्लेटलेट, रक्तातील साखर आदी. त्याचबरोबर ताप, सर्दी, खोकला, कॅल्शीअम, आर्यन, फोलीक सीड, बीपी, साखर आदी गोळ्या आणि कॅप्सूल ही देण्यात आल्या. त्याचबरोबर आई ड्रॉप्स, कफ सायरप आदी औषधांचे मोफत वाटत करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा बाबासाहेब सावते, आणि प्रा. डॉ. युवराज पाटील, ग्रीन क्लब समन्वयक प्रा. डॉ. उध्दव भाले, सहसमन्वयक प्रा. डॉ. निलेश शेरे, प्रा. डॉ. हंसराज जाधव, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी लेप्ट. प्रा. डॉ. अतिश तिडके आणि वुमेन सेलच्या प्रा. डॉ. रोहीणी महिंद्रकर यानी पुढाकार घेतला. ह्या कार्यक्रमासाठी कार्यालयीन अधिक्षक श्री. धंनजय पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार डॉ. निलेश शेरे यानी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमूख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विध्यार्थी विध्यार्थींनी मोठ्या संख्येने आरोग्य शिबीरास उपस्थित राहून आरोग्य तपासणीज्ञ करून प्रथमोपचार घेतला.

# भिवंडी ग्रामीण विधानसभा संघटकपदी मनोहर ठाकरे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी, मिलिंद जाधव : शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते व कुशल संघटक म्हणून ओळखले जाणारे मनोहर ठाकरे यांची भिवंडी ग्रामीण विधानसभा संघटकपदी नियुक्ती करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.


भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात सर्वानां सुपरिचीत असलेले मनोहर ठाकरे यांनी डोहळे ग्रामपंचायतीचे सरपंच पद भुषविले असुन सध्या ते पडघा शेतकरी सहकारी भातगिरणीचे उपसभापती असुन कोंशीबी गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक आहेत. सामान्य शेतकरी ते यशस्वी उद्योजक असा त्यांचा प्रवास असुन भिवंडी ग्रामीण मध्ये त्यांचा चांगला जनसंपर्क आहे.तसेच त्यांनी भिवंडी तालुका ग्रामीणच्या सचीव पदाची जबाबदारी सुध्दा सांभाळली असुन शिवसेना उपनेते प्रकाश पाटील उपजिल्हाप्रमुख विष्णू चंदे यांच्या शिफारशीनुसार शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने जिल्हा प्रमुख डॉ. देवानंद थळे यांच्या सहीचे नियुक्तीपत्र खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांच्या हस्ते मनोहर ठाकरे यांना शनिवारी पार पडलेल्या भिवंडी येथील आढावा बैठक कार्यक्रमात देण्यात आले. यावेळी आमदार शांताराम मोरे मदनबुवा नाईक, अरुण पाटील, उपस्थीत होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे यांची संघटकपदी नियुक्ती झाल्याने ग्रामीणमधील शिवसैनिकांच्यात उत्साहाचे वातावरण आहे.



# कोठावळा पिंपळगाव येथे वीज पडून एक गाय व म्हैस जागीच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब, सुधाकर रणदिवे : तालुक्यातील कोटावळा पिंपळगाव येथील शेतकरी अण्णा आप्पाराव कोठावळे यांच्या शेतामध्ये दिनांक २१/१०/२०२४ रोजी वार सोमवार दुपारी तीन च्या दरम्यान अचानक आलेल्या विजेच्या कडकडाटामध्ये विज पडून एक गाय व म्हैस जागीच ठार झाले आहे. अधिक माहिती अशी की दिनांक २१ रोजी दुपारी तीन-च्या सुमारास अचानक आलेल्या वारा, पाऊस,व विजेच्या कडकडाटासह शेतकरी अण्णा कोठावळे यांच्या शेतामध्ये बांधलेल्या म्हैस व गाईवर वीज पडून जागीच ठार झाले, विशेष म्हणजे गाय २५ लिटर व म्हैस १५ लिटर दुध देत होती, त्याबद्दल गावामध्ये मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.



## चालू गळीत हंगामा करिता ६.०० लाख मे.टना पेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट

## उमेश परिचारक यांचे प्रतिपादन

# युटोपियन शुगर्सचे बॉयलर अग्निप्रदीपन उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी कचरेवाडी ता.मंगळवेढा येथील युटोपियन शुगर्स लि. या कारखान्याच्या २०२४-२०२५ या अकराव्या गळीत हंगामाचे बॉयलर पूजन व अग्निप्रदीपन समारंभ सोमवार दि.२१/१०/२०२४ रोजी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते अत्यंत साधेपणाने उत्साही वातावरणात संपन्न झाले.

प्रारंभी कारखान्याचे डे. चिफ इंजिनियर श्री. सुदर्शन बर्गे यांच्या शुभहस्ते सपत्नीक सत्यनारायण महापूजा करण्यात आली.

यावेळी बोलताना चेअरमन श्री उमेश परिचारक म्हणाले की, आपल्या कारखान्याचा हा अकरावा गळीत हंगाम असून मागील दहा हंगामात युटोपियनने भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात ६.०० लाख मे.टन ऊसाचे गाळप करून ऊसाच्या रसापासुन व बी हेवी मोलॅसेस पासून १.५० कोटी लिटर इथेनॉल उत्पादित करणार असलेचा मानस आहे. चालू गळीत हंगामात ऊसाची उपलब्धता चांगली असून गत दहा हंगामात ऊस उत्पादक हे युटोपियन कारखान्यास ऊस देण्यास प्राधान्य देतात व यापुढे हे देतील अशी मला खात्री आहे.

या गळीत हंगामात कारखान्याचे मार्गदर्शक आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या सुचने नुसार सांगोला-पंढरपूर-मंगळवेढा व मोहोळ या तालुक्यातील कारखान्याच्या सभासदांचा संपूर्ण ऊस गाळप केला जाईल. त्यामुळे ऊस उत्पादकांनी चिंता न करता कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन ही परिचारक यांनी केले. कारखान्याने या वर्षी १० हार्वेस्टर मशिन घेतलेल्या आहेत तसेच २०० ट्रॅक्टर, १५० मिनी ट्रॅक्टर या प्रमाणे करार केले आहेत.




यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले की, संपूर्ण ऊसाचे गाळप करण्यासाठी कारखाना यंत्रणा सज्ज आहे. ऊस उत्पादक शेतकरी यांना दिवाळी सणासाठी प्रती किलो २५/- रु. प्रमाणे १० किलो साखर वाटप करणेत येईल. सर्व कामगार वर्ग हा चालू गळीत हंगाम यशस्वी करतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. सर्व कामगारांची दिवाळी गोड जाणेसाठी कामगारांना दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ८.३३ टक्के बोनस दिला जाईल. या कार्यक्रमासाठी कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी, खातेप्रमुख व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संगणक विभागप्रमुख अभिजीत यादव यांनी मानले.

# पुणे रहिवासी संघ आयोजित स्नेह मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : २५० अक्कलकोट विधानसभा वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार श्री संतोष कुमार खंडू इंगळे यांच्या प्रचारात अक्कलकोट तालुक्यातील जी पुणे येथे स्थायिक झालेले आहेत त्या पुणे रहिवासी संघतर्फे आयोजित करण्यात आलेला स्नेह मेळावा अतिशय मोठ्या प्रमाणात संपन्न झाला. वेगवेगळ्या गावातील जनता अक्कलकोटमध्ये कामधंदे नसल्यामुळे पुणे येथे स्थायिक झालेले आहेत वंचित बहुजन आघाडी चे अधिकृत उमेदवार श्री संतोष कुमार इंगळे यांच्याबरोबर हितगुज करण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आलेला होता. या मेळाव्याची प्रमुख आकर्षण आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांचे ज्येष्ठसहकारी भारिप बहुजन महासंघापासून आतापर्यंत आदरणीय बाळासाहेबांचे साथ न सोडणारे पुणे वंचित बहुजन आघाडीचे नेते वसंतदादा साळवे यांचा मोलाचे मार्गदर्शन यावेळी या मेळाव्यास लाभले आणि वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांचेही मनोगत यावेळी उपस्थित रहिवाशांना करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत बनसोडे राजु कांबळे मधुकर दुपारगुडे राम हल्ले रमेश वटार, चंदू वटार, दशरथ मडी खांबे, अजित गायकवाड, याचबरोबर सर्व कार्यकर्त्यांनी अत्यंत मेहनत घेऊन हा मेळावा यशस्वी केला.